

# महाराष्ट्र शासन
# अर्थसंकल्प २०२०-२१
# सर्वसाधारण चर्चा


**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,

मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏०२२-२२००३०६०

✉: samarthanmumbai97@gmail.com

www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री.आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव: **आशिष भोसले**

संपादन :**मुक्ता भारती**

विश्लेषण आणि संकलन:
**रुपेश कीर -९८९२९३९६१७**

विशेष सहाय्य :
**स्नेहा घरत, सुनिल मिश्रा, निलम काकड, हिंदप्रभा कर्वे, मनोज सातवी, विलाससुवरे, राजश्री कदम, उमेश सांगळे**

मांडणी व अक्षरजुळणी:
**प्रतिक्षा कोयंडे**



**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मकअभ्यास करता यावा म्हणून २०१२-१३पासून२०१८-१९ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०१९-२० सुधारित अंदाज तसेच २०२०-२१चेअंतरिम अर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केली आहे.
- सदर माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन:रुपेश कीर -९८९२९३९६१७

**मार्गदर्शक-विवेक पंडित**

संस्थापक, समर्थन

# महाराष्ट्र राज्याची ठळक वैशिष्ट्ये

**दृष्टिक्षेपात महाराष्ट्र :**

- राज्याची लोकसंख्या २०११च्या जनगणनेनुसार ११ कोटी २४ लाख असून त्यामध्ये पुरुषांची लोकसंख्या ५ कोटी ८२ लाख तर महिलांची लोकसंख्या ५ कोटी ४१ लाख आहे.
- राज्याचामानव विकास अहवाल २०१२ नुसार राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.७५२ आहे. तरमुंबईचा मानव विकास निर्देशांक सर्वात अधिक ०.८४१ आहे. त्याचवेळेला नंदुरबार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सर्वात कमी ०.६०४ आहे.
- राज्यातील जन्मदर १५.९ असून संपूर्णदेशात तो २०.८ आहे. तर राज्यात मृत्यूदर ५.९ देशात ६.५आहे.
- राज्यात अर्भक मृत्यूदर २१ आहे तर देशात ३७ आहे तर माता मृत्यूचे राज्यात प्रमाण ६८ तर देशात १६७ आहे. (जन्मलेल्या दर १०००जीवित वा मृत मुलांमागे)
- महाराष्ट्र राज्याचे स्त्री-पुरुष प्रमाण ९२९ असून ते देशापेक्षा (९४३) कमी आहे. केरळ (१०८४), तामिळनाडू (९९६), कर्नाटक (९७३), उत्तर प्रदेश (९६३), मध्य प्रदेश (९३१) ही राज्य महाराष्ट्राच्या पुढे आहेत.

**लोकसंख्या:**

- वर्ष २०११ मध्ये राज्याच्या ११ कोटी २४ लाख लोकसंख्येपैकी ५ कोटी ८२ लाख (४५.२%) लोकसंख्या ही नागरी भागात राहत आहे. मात्र त्याचवेळेला नागरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येपैकी १ कोटी १८ लाख (२३.३%) लोकसंख्या ही झोपडपट्टीमध्ये राहत आहे.
- वर्ष २०११च्या जनगणनेनुसार राज्यातील ५७ हजार कुटुंबातील २ लाख ११ हजार लोक हे बेघर आहेत.
- जनगणना वर्ष २०११ नुसार मागील ९ वर्षात इतर राज्यातील सुमारे ३८ लाख १३ हजार व्यक्तींनी व इतर देशातील सुमारे १ लाख २० हजार व्यक्तींनी राज्यात स्थलांतर केले आहे. राज्यात स्थलांतरित झालेल्यांची एकूण संख्या सुमारे ३९ लाख ३३ हजार आहे. हे स्थलांतर प्रामुख्याने मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे व पुणे या जिल्ह्यांमध्ये झाले आहे.

- इतर राज्यातून आलेले स्थलांतरित प्रामुख्याने कामकाज व रोजगार यासाठीच येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांची व्यवस्था लावण्यात अपयश येत असल्याने राज्यावरील ताण वाढत आहे.
- २०११च्या जनगणनेनुसार राज्यातील स्त्री-पुरुष प्रमाण हे ९२९ आहे. ग्रामीण भागात ते ९५२ असून शहरी भागात ९०३ इतके कमी आहे.
- महाराष्ट्राचा साक्षरता दर ८२.३% असून पुरुष ८८.४% तर स्त्रियांचा साक्षरता दर ७५.९% आहे.
- मराठवाडा विभागात साक्षरता दर सर्वात कमी असून तो ७६.४% इतका आहे. मराठवाड्यातील स्त्री साक्षरता दर सर्वात कमी म्हणजे ६४.४% आहे.

राज्याच्या अर्थव्यवस्थेला घरघर:

- वर्ष २०१८-१९ मध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न रु. १ लाख ९१ हजार ७३६ इतके असून दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत हरियाणा रु. २ लाख २६ हजार ६४४ , कर्नाटक रु. २ लाख १० हजार ८८७,तेलंगणा रु. २ लाख ५ हजार ६९६,तामिळनाडू रु. १ लाख ९३ हजार ७५० ही राज्य आपल्या पुढे आहेत.
- राज्य उत्पन्नाचा सरासरी हिस्सा सेवा क्षेत्र ५५.२%, उद्योग क्षेत्र ३३.१% तर कृषि व संलग्न कार्य ११.७% इतका आहे.

लोकवित्त तुटीत :

- वर्ष २०१९-२० मध्ये रु. ३ लाख १४ हजार ६४० कोटी रुपयांची महसुली जमा होणे अंदाजित होते. मात्र त्याच वेळेला रु. ३ लाख ३४ हजार ९३३ कोटी महसुली खर्च होणार आहे. त्यामुळे रु. २० हजार २९३ कोटींची महसुली तूट येणार आहे.
- मात्र त्याच वेळेला भांडवली जमा रु. ८९ हजार ८८७ कोटी असून खर्च रु. ६९ हजार ८६१ कोटी केला जाणार आहे. एकूण तूट कमी करण्यासाठी भांडवली खर्चात रु.२० हजार २६ कोटींची कपात केली जाणार आहे. त्यामुळे एकूण अर्थसंकल्पात केवळ रु.२६७ कोटींची तूट येणार आहे.

- अर्थसंकल्पातील तूट कमी होण्याचे मुख्य कारण भांडवली जमेत वाढ झालेली असताना भांडवली खर्चात केलेली कपात हे आहे आणि हे सातत्याने घडत आहे.
- वर्ष २०१७-१८ मध्ये प्रत्यक्ष राजकोषीय तूट रु. २३ हजार९६१ कोटींची होती. वर्ष २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्पात ती रु. ५६ हजार ५३ कोटींवर पोहोचली तर २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय अंदाजात ही तूट रु. ६१ हजार ६७० कोटींची झाली आहे.
- वर्ष २०१८-१९च्या सुधारित अंदाजानुसार महाराष्ट्राची महसुली जमा रु. २ लाख ८६ हजार ५०० कोटींची असून महसुली खर्च रु. ३ लाख १ हजार ४६० कोटी आहे.
- वर्ष २०१९-२० मध्ये केंद्र शासनाकडून राज्याला रु. ८७ हजार ६४६ कोटींचे वित्तीय अनुदान मिळणार आहे. परंतु २०१८ मध्ये सुधारित अंदाजानुसार रु. ८१ हजा ३९० कोटी ७५ लाख निधी मिळणे आवश्यक होते. परंतु केवळ रु. ७५ हजार ९५३ कोटींचे अनुदान शासनाला मिळाले आहे. म्हणजेच रु. ५ हजार ४३७ कोटी ११ लाख कमी प्राप्त झाले.

## राज्यावरील कर्जाचा बोजा वाढला:

- वर्ष २०१७-१८ मध्ये राज्यावरील प्रत्यक्ष कर्ज रु. ४ लाख २ हजार ४२१ कोटी होते. तर वर्ष २०१८-१९च्या सुधारित अंदाजानुसार ते रु. ४ लाख १४ हजार ४११ कोटींवर गेले. मात्र २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार कर्जाचा हा भार रु. ४ लाख ७१ हजार ६४२ कोटींवर गेला आहे. तर २०२०-२१ मध्ये तो रु. ५ लाख कोटी २० हजार ७१ लाखांवर जाणार आहे.
- कर्जावरील व्याजापोटी राज्य शासनाला २०१७-१८ मध्ये रु.३३ हजार १८ कोटी द्यावे लागले होते. तर २०१८-१९ मध्ये रु. ३३ हजार ९२९ कोटी द्यावे लागतील असे सुधारित अंदाज सांगत होते मात्र प्रत्यक्षात रु. ३४ हजार २१ कोटी द्यावे लागले तर वर्ष२०१९-२० मध्ये अर्थसंकल्पीय अंदाजानुसार हे व्याज प्रदाने रु. ३५ हजार २०७ कोटींवर जाणार आहे. वर्ष २०२०-२१ मध्ये व्याजापोटी रु. ३५ हजार ५३१ कोटी द्यावे लागणार आहेत.
- वर्ष २०१७-१८ मध्ये शासनाने विविध विभागांसाठी रु. २६ हजार ६५७ कोटी ७२ लाखांची हमी होती. त्यात सर्वात जास्त हमीची रक्कम रु. १९ हजार १७० कोटी २७ लाख (७१.९%) ही नगर विकास विभागाची होती.

**दरडोई उत्पन्नात राज्याची घसरण:**

- चालू किंमतीनुसार जिल्हा दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत मुंबई जिल्ह्याचे उत्पन्न सर्वात जास्त रु. ३ लाख २५ हजार ९५४, ठाणे जिल्हा रु. २ लाख ७५ हजार ५३८ व पुणे जिल्हा रु. २ लाख ५७ हजार ४८३ इतके जास्त आहे. तर सर्वात कमी उत्पन्न नंदुरबार जिल्ह्याचे रु. ८५ हजार ५०९, वाशिम जिल्हा रु. ८७ हजार ३९१ व हिंगोली जिल्हा रु. ८९ हजार ७१४ एवढे कमी आहे. त्यामुळे राज्यातील आर्थिक असमतोल सातत्याने वाढत आहे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी नाहीच:**

- राज्यात मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळता सर्व जिल्ह्यांत रोजगार निर्मितीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबवली जाते. या योजनेंतर्गत प्रौढ व्यक्ती अकुशल काम करण्यास इच्छुक कुटुंबाला केंद्र सरकारकडून एका वर्षात १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याची हमी देण्यात येते. मात्र या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे परंतु या योजनेची मुहूर्तमेढ ज्या राज्याने रोवली तेथेच होत नसल्याचे दिसून येते.

- रोजगार हमी योजना वर्ष २०१९-२० मध्ये फेब्रुवारीपर्यंत प्रति कुटुंब सरासरी केवळ ३७ मनुष्य दिवस इतका कमी रोजगार उपलब्ध झाला आहे. हेच प्रमाण वर्ष २०१६-१७ मध्ये ४९ मनुष्य दिवस, वर्ष २०१७-१८ मध्ये ही ४९ मनुष्य दिवस आणि वर्ष २०१८-१९ मध्ये ४७ मनुष्य दिवस रोजगार उपलब्ध झाला होता. रोजगार मिळण्याची ही स्थिती चिंताजनक असून या योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यात प्रति दिवस केवळ ६० रु. रोजगार मिळत आहे. म्हणजे किमान वेतन देखील मिळत नाही अशी स्थिती आहे. रोजगाराची ही स्थिती लक्षात घेता महाराष्ट्रात १०० दिवस रोजगार मिळणे अवघड झाले आहे.

- त्यामुळे महाराष्ट्रात रोजगारासाठी स्थलांतर करण्याचे प्रमाण मोठे आहे. जिल्ह्यांतर्गत व आंतरजिल्ह्यामध्ये ९ वर्षात १ कोटी ६६ लाख ७४ हजार लोकांनी रोजगारासाठी स्थलांतर केले आहे.

**प्राथमिक शिक्षणाची दैना:**

- वर्ष २०१७-१८ मध्ये राज्यात १ लाख ६ हजार ५४६ शाळा होत्या त्या तुलनेत २०१८-१९ मध्ये ३०९ शाळांची घट झाली असून ही संख्या १ लाख ६ हजार२३७ वर आली आहे.

- शाळेतील पटसंख्या १ लाख ७० हजाराने घटली.
- शिक्षकांची संख्या २० हजाराने घटली.
- ४३ हजार ६६३ शाळांमध्ये संगणक नाहीत.
- १५ हजार ८२९ शाळांमध्ये खेळाचे मैदान नाही.
- १९ हजार ९७२ शाळांमध्ये ग्रंथालय नाही.
- १० हजार ४६५ शाळांना संरक्षक भिंत नाही.

## महिलांवरील अत्याचारात वाढ:

- बलात्कार, अपहरण व पळवून नेणे, पती व नातेवाईकांकडून झालेली क्रूर हत्या व इतर गुन्ह्यात वर्ष २०१८च्या तुलनेत वर्ष २०१९ मध्ये २ हजार ७० ने वाढ झालेली आहे. वर्ष २०१८ मध्ये ही संख्या ३५ हजार ४९७ होती. ती वर्ष २०१९ मध्ये ३७ हजार ५६७ इतकी झाली.

## कुपोषित बालकांची संख्या वाढली:

- वर्ष २०१९ मध्ये ५७ लाख २७ हजार २४० बालकांचे वजन तपासले असता त्यापैकी ५ लाख २१ हजार २४२ बालके ही कुपोषित होती. तर ८० हजार १९१ बालके ही तीव्र कुपोषित आढळली.

## आदिवासी घटक कार्यक्रम खर्चात घट:

- वर्ष २०१९-२०मध्ये आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरीय योजना, जिल्हास्तरीय योजना ००० (५६%) निधी शासन खर्चकसा करणार हा खरा प्रश्न आहे. आदिवासींसाठी केवळ कार्यक्रमांच्या घोषणा केल्या जातात, योजना आखल्या जातात मात्र त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचे हे निदर्शक आहे.

## दिव्यांगाना मदतीचा हात नाहीच:

- महाराष्ट्रात २०११च्या जनगणनेनुसार २९ लाख ६३ हजार दिव्यांग आहेत. त्यापैकी ९ लाख ६०हजार लाख (३२.४%) दिव्यांग हे निरक्षर आहेत.
- तर दृष्टीदोष, कर्णबधीरता, मूक-बधीर, हालचाल दोष, मतिमंदत्व, मानसिक आजार व इतर आजार अशा बहुविध दोषांमुळे १५ लाख ३४ हजार (५१.८%) दिव्यांग ग्रासलेले आहेत.
- राज्यातील २९ लाख ६३ हजार दिव्यांगांपैकी १७ लाख १६ हजार (५७.९१%) दिव्यांग हे एकतर बेरोजगार तरी होते किंवा दुसऱ्यांवर अवलंबून होते.
- ११ हजार १५४ शाळांमध्ये दिव्यांगासाठी उतरंड बांधलेली नाही.

## राज्यामधील रास्त भाव वाटप योजनेची स्थिती:

- वर्ष २०१७-१८ मध्ये दि. ३१ डिसेंबर, २०१९ रोजी राज्यामध्ये शिधापत्रिकाधारकांची संख्या २ कोटी ५४ लाख इतकी असून त्यांच्यासाठी ५२ हजार ४२३ रास्त भाव दुकाने आहेत.
- वर्ष २०१९ मध्ये ३५ हजार ४६८ रास्त भाव दुकानाची निरीक्षणे घेण्यात आली होती. या निरीक्षणानंतर ६४ रास्त भाव दुकानाचे परवाने रद्द करण्यात आले तर १६६ दुकानाचे परवाने निलंबित करण्यात आले तर त्यांच्याकडून रु.२४ कोटी २६ लाखांचा दंड वसूल करण्यात आला मात्र परवाने रद्द वा निलंबित केल्यामुळे त्या भागातील शिधापत्रिकाधारकांना कोणता पर्याय उपलब्ध करून देण्यात आला याची माहिती दिलेली नाही.
- राज्यात अंत्योदय योजनेअंतर्गत २४ लाख ४३ हजार शिधापत्रिकाधारक तर प्राधान्य कुटुंब १ कोटी २६ लाख ४० हजार असे एकूण १ कोटी ५०लाख ८३ हजार शिधापत्रिकाधारक असून उत्तर प्रदेश (३ कोटी ५२ लाख १ हजार) नंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो.

*(स्त्रोत:आर्थिक पाहणी, २०१९–२० व संक्षिप्त अर्थसंकल्प २०२०-२१)*

# राज्य अर्थसंकल्प २०२०-२१

## महसुली अधिक्य गाठण्यासाठी सामाजिक कार्यक्रमांना कात्री:

- महाविकास आघाडी शासनाने मांडलेला वर्ष २०२०-२१साठीचा हा पहिला अर्थसंकल्प असून या अर्थसंकल्पाची एकूण रक्कम रु. ४ लाख कोटी ३४ हजार ८४ कोटी एवढी आहे.
- वर्ष २०२०-२१ साठी राज्याची महसुली जमा रु. ३ लाख ४७हजार ४५६ कोटी ८९ लाख एवढी अर्थसंकल्पीत केली आहे. तर महसुली खर्च रु. ३ लाख ५६ हजार ९६७ कोटी ६० लाख आहे. म्हणजे रु. ९ हजार ५१० कोटी ७१ लाख महसुली तूट येईल असा अंदाज आहे. तर २०१८-१९ मध्ये प्रत्यक्ष महसुली जमा रु. २ लाख ७८ हजार ९९६ कोटी होते. त्या तुलनेत महसुली खर्च रु. २ लाख ६७ हजार २१ कोटी ६७ लाख झाला आहे. म्हणजेच महसुली खर्चात घट झाली आहेत्यामुळे महसुली अधिक्य रु. ११हजार ९७४ कोटी इतके झाले आहे.
- वर्ष २०१८-१९ मध्येसामाजिक व सामूहिक सेवा मध्ये रु. ३७ हजार ९२८ कोटी ८२ लाख खर्च अपेक्षित होता त्यापैकी, रु. २८ हजार २१७ कोटी ८८ लाख झाला याचाच अर्थ रु. ९ हजार ७१० कोटी ९४ लाखांचा (२५.६०%) निधी कमी खर्च झाला आहे आणि महसुली अधिक्य येण्याचे हेच मुख्य कारण आहे.

## प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावरील कर्जात वाढ:

- वर्ष २०२०-२१ मध्ये राज्यावरील एकूण कर्जाची रक्कम रु. ५ लाख २० हजार ७१७ कोटी एवढी अंदाजित केली असून राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या डोक्यावरील कर्ज रु. ४६ हजार ३२७ रुपये आहे.

## राज्याच्या महसुलात होतेय घट:

- वर्ष २०१८-१९ मध्ये कर महसुलाच्या सुधारित रक्कम रु. १ लाख ८८ हजार ९३१ कोटी २८ लाख निश्चित करण्यात आली होती परंतु प्रत्यक्षात रु. १ लाख ८७ हजार ५३७ कोटी ९९ लाख जमा झाले म्हणजेच रु. १ हजार ३९३ कोटी २९ लाखांची घट झाली.
- वर्ष २०१८-१९ मध्ये सुधारित करेतर महसूल रु. १७ हजार ५० कोटी २८ लाख एवढे निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी केवळ रु. १५ हजार ८४३ कोटी ५६ लाख जमा झाले म्हणजे रु. १ हजार २०६ कोटी ७२ लाखांचा निधी कमी जमा झाला.

## केंद्र शासनाकडून मिळणारा निधी घटला:

- वर्ष २०१८-१९ मध्ये केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदाने व अंशदानाची सुधारित तरतूद रु. ३८ हजार ४६७ कोटी ७१ लाखांची तरतूद करण्यात आली होती मात्र प्रत्यक्ष जमा रु. ३३ हजार ६६२ कोटी १३ लाख झाली याचाच अर्थ रु. ४ हजार ८०५ कोटी ५८लाख कमी जमा झाले.
- वर्ष २०१८-१९मध्ये महसुली अधिक्य रु. ११ हजार ९७४ कोटी ६० लाख, राजकोषीय तूट रु. २३ हजार १५ कोटी ३३ लाख,कर्ज रु. ५ लाख २० हजार ७१७ कोटी आहे.
- वर्ष २०१८-१९ राजकोषीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण ०.८७% असून कर्जाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १५.४६%आहे. वर्ष २०१९-२० साठी स्थूल राज्य उत्पन्न रु.२८ लाख ७८ हजार ५८३ कोटी सुधारित आहे. तर वर्ष २०२० साठी रु. ३२ लाख २४ हजार १३ कोटी इतके अंदाजित आहे.
- वर्ष २०१८-१९ मध्ये वेतन, निवृत्ती वेतन व व्याजावर रु. १ लाख ४० हजार ७७२ कोटी खर्च झाला आहे. याच वर्षी एकूण महसुली खर्च रु. २ लाख ६७ हजार २२ कोटी झाला होता. याचाच अर्थ एकूण महसूली खर्चात वेतन, निवृत्ती वेतन व व्याज याचे प्रमाण ५२.७२% आहे.

## सामाजिक विभागांच्या खर्चात सातत्याने घट:

- वर्ष २०१७-१८ मध्ये महिला बाल विकास, सार्वजनिक आरोग्य, आदिवासी विकास, शिक्षण, अन्न व नागरी पुरवठा व सामाजिक न्याय या ६ विभागांचा एकत्रित अर्थसंकल्पीय अंदाज रु. ८६ हजार ९७० कोटींचा होता. त्यापैकी प्रत्यक्ष खर्च रु. ७७ हजार ५३७ कोटींचा झाला याचाच अर्थ रु. ९ हजार ४३२ कोटींच्या योजनांच्या खर्चात कपात केली गेली.
- वर्ष २०१८-१९ मध्ये महिला व बाल विकास, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, शालेय शिक्षण, अन्न व नागरी व पुरवठा तसेच या ६ सामाजिक विभागांसाठी रु. ९२ हजार ९६६ कोटी खर्च सुधारित करण्याचा आला होता. मात्र प्रत्यक्षात रु. ८१ हजार ८५४ कोटी ९४ लाख इतकाच खर्च करण्यात आला. म्हणजेच ११ हजार १११ कोटींच्या खर्चात घट करण्यात आली. यावरून असे दिसून येते की, दरवर्षी सातत्याने सामाजिक विभागांवरील खर्चात घट होत आहे.

**राज्य शासनास येते कर्ज उभारण्यास अपयश:**

- वर्ष २०१८-१९ मध्ये सादर केलेल्या सुधारित अर्थसंकल्पात रु. ५५ हजार ३१० कोटी ८० लाख एवढी निव्वळ कर्ज उभारणी करायची होती. मात्र शासनाने वर्ष २०१८-१९ मध्ये प्रत्यक्षात केवळ रु. २३ हजार ९५७ कोटी २१ लाख कर्जाऊ मिळाले. त्यामुळे कर्जाऊ रकमेत रु. ३१ हजार ३५३ कोटी ५९ लाखांची घट झाली. त्याच वेळेला सामाजिक क्षेत्रावरील खर्च कमी झाल्याने अनेक सामाजिक योजनांच्या खर्चाला देखीलकात्री लावली गेली आहे. यावरून शासन कर्ज उभारणीत देखील अपयशी ठरत आहे हे सिद्ध होते.

**राज्यातील रिक्त पदांची संख्या वाढली:**

- वर्ष २०१८-१९ मध्ये शासनाचा एकूण कर्मचारी वर्ग १५ लाख ५७ हजार ३३४ इतकी असून त्यांच्या वेतनावर रु. ८९ हजार ९४८ कोटी खर्च केले गेले. मात्र त्याच वेळेला राज्यात १ लाख ७३ हजार ८४० पदे रिक्त आहेत.


**राज्य शासनाला महसूल वसूल करण्यात अपयश:**

- मागील ११ वर्षात रु. १ लाख ३ हजार ९२६ कोटी ७० लाखांचा महसूल वसूल झालेला नाही.
- मागील ५ वर्षात करेतर महसुलाची रु. ४ हजार ३०७ कोटी ८० लाखांची थकबाकी वसूल झालेली नाही.
- शासन १२ विभागांना रु. २५ हजार १३४ कोटी ८६ लाख रकमेसाठी हमी राहिले होते. हमी राहिलेल्या रकमेसाठी शासनाला रु. १ हजार ६१५ कोटी ८० लाखांची फी किंवा कमिशन द्यावे लागले आहे.

*( स्त्रोत : वित्त विषयक विवरण पत्र, संक्षिप्त अर्थसंकल्प, मध्यम मुदतीचे अर्थसंकल्पीय धोरण, नियोजन विभागाचे वार्षिक कार्यक्रम २०१९-२० व २०२०-२१)*

# राज्य अर्थसंकल्पाचे आकारमान वाढते मात्र प्रत्यक्षात खर्चात घट

आलेख क्र: १ **राज्य अर्थसंकल्पाचे वाढते आकारमान:**




| | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | १७०११० | १९४०६७ | २२४०५६ | २४३०२६ | २७०७६३ | ३००३९७ | ३६७२८० | ४०३२०७ | ४३४०८४ |
| सुधारित अंदाज | १७२०१८ | १९७१८७ | २३०९३२ | २४७३२४ | २८२४५४ | ३२३६५२ | ३७३२३४ | ४१६९२१ | |
| प्रत्यक्ष खर्च | १६५४६८ | १८७९८२ | २१७७४७ | २२५२८६ | २५६९४२ | २८६७६८ | ३२८७३२ | | |

*( स्रोत : वित्तविषयक विवरणपत्र, टीप : अर्थसंकल्प २०२०-२१, सुधारित अंदाज २०१९-२०, अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१)*

- **वर्ष २०२०-२१ चा अर्थसंकल्प रु. ४ लाख ३४ हजार ८४ कोटींचा आहे. आधीच्या वर्षाच्या अर्थसंकल्पाशी म्हणजेच वर्ष २०१९-२०च्या सुधारित अंदाजाशी तुलना करता रु. १७ हजार १६३ कोटींनी अधिक आहे.**
- **वर्ष २०१२-१३ ते २०१८-१९ या कालखंडाचा विचार करता वर्ष२०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६,२०१६-१७,२०१७-१८ व वर्ष२०१८-१९ मधील प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा अनुक्रमे रु. ४ हजार ६४२ कोटी, रु. ६ हजार ८५ कोटी, रु. ६ हजार ३९० कोटी, रु. १७ हजार ७४० कोटी, रु. १३ हजार ८२१ कोटी, रु. १३ हजार ६२९ कोटी व रु. ३८ हजार ५४८ कोटी इतका कमी झाला होता.**
- **वर्ष २०१२-१३ ते २०१८-१९ मधील प्रत्यक्ष खर्च सुद्धा नेहमीच सुधारित अंदाजापेक्षा कमी झालेला आढळतो. वर्ष २०१९-२० मध्येही तोच कल कायम राहणार आहे.**
- **वर्ष२०१८-१९ मध्ये प्रत्यक्ष खर्च सुधारित अंदाजापेक्षा रु.४४ हजार५०२ ने कमी झाला आहे. तेवढ्या रकमेने खर्चात कपात झाली.**
- **सुधारित अंदाजांपेक्षा प्रत्यक्ष खर्च कमी याचाच अर्थ निधीची उपलब्धता न झाल्याने खर्चाला लावलेली कात्री म्हणावी लागेल.**

# क्षेत्रनिहाय खर्चात २१ हजार ९८१ कोटी रुपयांची कपात

## ग्रामीण विकासाला खीळ

### (क्षेत्रनिहाय खर्च-वार्षिक कार्यक्रम-२०१८-१९)

तक्ता क्र.१ *(रु. कोटीत)*

| वर्ष २०१८-१९ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अक्र. | क्षेत्र | अपेक्षित खर्च | प्रत्यक्ष खर्च | घट | % |
| १. | कृषि व संलग्न सेवा | १९,४७२.५४ | ११,४२८.४२ | ८,०४४.१२ | ४१.३१ |
| २. | ग्रामीण विकास | ४,९८४.७३ | ३,७९५.४० | १,१८९.३३ | २३.८६ |
| ३. | विशेष क्षेत्र विकास | १४१.१० | ११८.१८ | २२.९२ | १६.२४ |
| ४. | पाटबंधारे व पूरनियंत्रण | ८,७६९.६५ | ७,८८८.६४ | ८८१.०१ | १०.०४ |
| ५. | ऊर्जा | १४,६६८.८८ | ९,७१३.९९ | ४,९५४.८९ | ३३.७७ |
| ६. | उद्योग व खाण | ९०४.७८ | ४८६.६८ | ४१८.१० | ४६.२१ |
| ७. | परिवहन | १२,६६६.७१ | १६,७७५.०६ | -४,१०८.३५ | -३२.४३ |
| ८. | विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | १४४.८२ | १३६.६० | ८.२२ | ५.६८ |
| ११ | सामान्य आर्थिक सेवा | ९९०.३६ | ८९०.५४ | ९९.८२ | १०.०८ |
| १२ | सामाजिक व सामूहिक सेवा | ३७,९२८.८२ | २८,२१७.८८ | ९,७१०.९४ | २५.६० |
| १२. | सामान्य सेवा | ३,७९३.६४ | ३,३३४.२४ | ४५९.४० | १२.११ |
| १३. | इतर कार्यक्रम | ३,४८५.३१ | ३,१८४.०० | ३००.६९ | ८.६३ |
| | एकूण | १,०७,९५१.३३ | ८५,९६९.६२ | २१,९८१.०९ | २०.३६ |

*(स्रोत :वार्षिक कार्यक्रम, संक्षिप्त विवरण पत्र-२०१९-२० व २०२०-२१, वित्त विभाग)*

- **क्षेत्रनिहाय खर्चाचा आढावा घेता असे दिसून येते की, वर्ष २०१८-१९ मध्ये १३ क्षेत्रावरील कार्यक्रमांसाठी रु. १ लाख ७ हजार ९५१ कोटी ३३ लाख अपेक्षित खर्च होता त्यापैकी, प्रत्यक्ष खर्च केवळ रु. ८५ हजार ९६९ कोटी ६२ लाख करण्यात आला आहे.याचाच अर्थ रु. २१ हजार ९८१ कोटी ९ लाख (२०.३६%) इतका कमी निधी या क्षेत्रांच्या कार्यक्रमांवर खर्चझाला.**
- **कृषि व संलग्न सेवांसाठी रु. १९ हजार ४७२ कोटी ५४ लाखांचा खर्च करणे अपेक्षित होते मात्र प्रत्यक्ष खर्च कमी होता. फक्त रु. ११ हजार ४२८ कोटी ४२ लाखांचा खर्चकेला आहे. म्हणजेच रु. ८ हजार ४४ कोटी १२ लाखांचा खर्च कमी झाला आहे. म्हणजे एकूण खर्चात ४१.३१%ची घट झाली आहे.**
- **तर पाटबंधारे व पूरनियंत्रण तसेच ऊर्जा क्षेत्रासाठी अपेक्षित खर्च रु. ८ हजार ७६९ कोटी ६५ लाख होता मात्र प्रत्यक्षात रु. ७ हजार ८८८ कोटी ६४ लाख खर्च करण्यात आले. म्हणजेच अपेक्षित खर्चापेक्षा रु. ८८१ कोटी १ लाखांचा (१०.०४%) कमी निधी दिला गेला.**
- **वित्तमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात वर्ष २०१८-१९ मध्ये रु. ११ हजार ९७४ कोटी ६० लाखांचे महसुली अधिक्य दाखविले आहे. मात्र जर वरील क्षेत्रांवर अपेक्षित रु. २१ हजार ९८१ कोटी खर्च केला असता तर वर्ष२०१८-१९ मध्ये रु. १० हजार ६ कोटी ४९ लाखांची महसुली तूट आली असती हे निश्चित.**

# सामाजिक विभागांच्या खर्चात ११ हजार १११ कोटींची कपात

## सामाजिक विभागांचा विकास रोखला

तक्ता क्र.२ *(रु. कोटीत)*

| वर्ष २०१८-१९ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अक्र. | विभाग | अपेक्षित खर्च | प्रत्यक्ष खर्च | घट | % |
| १. | शालेय शिक्षण | ४८,४७८.२५ | ४४,३७९.५७ | ४,०९८.६८ | ८.४५ |
| २. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | ११,२०२.१७ | ९,५७६.१२ | १,६२६.०५ | १४.५१ |
| ३. | सार्वजनिक आरोग्य | ११,००९.२४ | ८,८१८.९४ | २,१९०.३० | १९.९० |
| ४. | आदिवासी विकास | १०,७५६.७४ | ८,६१५.९७ | २,१४०.७७ | १९.९० |
| ५. | अन्न व नागरी पुरवठा | ६,८२५.२० | ६,५४१.२६ | २८३.९४ | ४.१६ |
| ६. | महिला व बाल विकास | ४,६९४.५० | ३,९२३.०८ | ७७१.४२ | १६.४६ |
| | एकूण | ९२,९६६.१० | ८१,८५४.९४ | ११,१११.१६ | ११.९५ |


*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज , भाग -२ खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१)*

- **वर्ष २०१८-१९ मध्ये शालेय शिक्षण, सामाजिक न्याय, सार्वजनिक आरोग्य, आदिवासी विकास, अन्न व नागरी पुरवठा तसेच महिला व बाल विकास या ६ विभागांच्या खर्चात रु. १ हजार १११कोटी १३ लाखांची घट झाली आहे.**
- **शालेय शिक्षणविभागाच्या खर्चात सर्वात मोठी घट झाली असून ती रु. ४ हजार ९८ कोटी ६७ लाखांची आहे.**
- **सामाजिक न्याय विभाग रु. १ हजार ६२६ कोटी ५ लाख, सार्वजनिक आरोग्य विभाग रु. २ हजार १९० कोटी ३० लाख, आदिवासी विकास विभाग रु. २ हजार १४० कोटी ७७ लाख, अन्न व नागरी पुरवठा रु. २८३ कोटी ९४ लाख, तर महिला व बाल विकास विभाग ७७१ कोटी ४२ लाख अशी घट झाली आहे.**

# सामाजिक सेवांवरील खर्चाला कात्री लावून शासन आणू पाहतेय राजकोषीय स्थैर्य

महसुली व राजकोषीय तुटीचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण हे शासनाच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्यानुसार शासनास महसुली तूट २००८-०९ पर्यंत शून्यावर व राजकोषीय तूट राज्य स्थूल उत्पन्नाच्या प्रमाणात ३%वर आणावयाची होती. वर्ष २००६-०७ पासून अनेक खटपटी करून शासनाने हे उद्दिष्ट साध्य केले होते.

आलेख क्र: २ **तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण:**




| | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राजकोषीय तूट | ०.९० | १.७० | १.८० | १.४० | १.७० | ०.९६ | ०.८७ | २.७३ | १.६९ |
| महसुली तूट | -०.३० | ०.३० | ०.७० | ०.३० | ०.४० | -०.०९ | -०.४५ | १.०९ | ०.२९ |

*(स्त्रोत:वित्तविषयक विवरण पत्र, टीप : अर्थसंकल्प २०२०-२१, अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१, सुधारित अंदाज २०१९-२०)*

- वर्ष २०१९-२० चे सुधारित आणि वर्ष २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज पाहता महसुली तूट अनुक्रमे १.०९व ०.२९ इतकी राहणार असून राजकोषीय तूट अनुक्रमे २.७३ व १.६९ इतकी असणार असे अंदाज दिलेले आहेत.
- वर्ष २०१८-१९ मध्ये सामाजिक सेवांवरील खर्च रु. १ लाख २९ हजार ४९९ कोटी इतका सुधारित केला होता. मात्र प्रत्यक्षात रु. १ लाख ३९१ कोटी खर्च करण्यात आला. म्हणजे या खर्चात रु. २० हजार १०८ कोटी (१५.५३%) घट झाली आहे.


वेतन, निवृत्ती वेतन, व्याज यासारख्या बांधिल खर्चामध्ये सातत्याने वाढ होत असून त्यामुळे महसुली तूट वाढत आहे. याचाच परिणाम होऊन भांडवली खर्चात आवश्यक त्या प्रमाणात वाढ करता येत नाही, ही चिंतेची बाब झाली आहे. करामध्ये अथवा करेतर महसुलामध्ये वाढ करण्यास असलेल्या मर्यादा विचारात घेता राज्यामुळे गुंतवणुकीस सुयोग्य वातावरण निर्माण करणे, अनुत्पादक खर्चास आळा घालणे, हाती घेतलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. जेणे करून राज्याच्या आर्थिक वाढीस हातभार लागेल.

# राज्यावरील कर्जाने ५ लाख कोटींचा आकडा पार केला

## राज्यावरील एकूण कर्ज रु. ५ लाख २० हजार ७१७ कोटी!

### तर कर्जावरील व्याजासाठी द्यावे लागणार रु. ३५ हजार ५०१ कोटी

आलेख क्र. ३ — राज्यावरील एकूण कर्ज




| | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यावरील एकूण कर्ज | २४६६९२ | २६९३५५ | २९४२६१ | ३२४२०२ | ३६४८१९ | ४०२४२१ | ४०७१५२ | ४६४०२० | ५२०७१७ |

*(स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प - २०२०-२१ )*

- **राज्याचा कर्जाचा आलेख हा सातत्याने वाढताना दिसतो. वर्ष २०१२-१३ ते वर्ष २०२०-२१ मध्ये व्याजासहित कर्ज पहाता राज्याच्या डोक्यावर वर्षाला सरासरी रु. ३ लाख ३५ हजार ९५९ कोटी इतके झाले आहे.**
- **वर्ष २०२० मध्ये राज्याचे एकूण कर्ज रु. ५ लाख २० हजार ७१७ कोटी इतके अंदाजित करण्यात आले आहे.या दायित्वामध्ये शासनाने विकासासाठी केलेले अन्य करार अंतर्भूत नाहीत. मान. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले अंदाज लक्षात घेतले व त्यात व्याज रु. ३५ हजार ५३१कोटी इतके व्याज मिळवले तर ती रक्कम रु. ५ लाख ५६ हजार २४८ कोटी इतकी होते. हा निधी राज्याच्या तिजोरीतून गेला नाही तरी ते दायित्व राज्याच्या जनतेवर अप्रत्यक्ष येणारच आहे.**
- **शासनाने वर्ष २०१८-१९ मध्ये रु. २३ हजार ९५७ कोटी कर्जाऊ घेतले त्यामुळे कर्जरु. ४ लाख ७ हजार १५२ कोटी झाले आहे. मात्र त्याच वेळेला सामाजिक क्षेत्रावरील खर्च कमी झाल्याने अनेक सामाजिक योजनांच्या खर्चात रु. २१ हजार ९८१ कोटी ९ लाखांची (२०.३६%)कपात झाली आहे.**

*(स्त्रोत :वार्षिक कार्यक्रम, संक्षिप्त विवरण पत्र-२०१९-२० व २०२०-२१ वित्त विभाग)*

# राज्यातील प्रत्येक नागरिकावर
# ४९ हजार ४८८ रुपयांचे व्याजासह कर्ज!

**राज्याचे एकूण कर्ज, व्याज तसेच स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई कर्ज**

तक्ता क्र.३ *(रु. कोटीत)*

| वर्ष | राज्यावरील कर्ज व स्थूल राज्य उत्पन्न | | | | दरडोई कर्ज (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| | कर्ज | व्याज | एकूण कर्ज | स्थूल राज्य उत्पन्न | |
| २०१२-१३ | २,४६,६९२ | १९,०७६ | २,६५,७६८ | १३,२२,२२२ | २३,६४५ |
| २०१३-१४ | २,६९,३५५ | २१,२०७ | २,९०,५६२ | १५,१०,१३२ | २५,८५० |
| २०१४-१५ | २,९४,२६१ | २३,९६५ | ३,१८,२२६ | १७,९२,१२२ | २८,३११ |
| २०१५-१६ | ३,२४,२०२ | २५,७७१ | ३,४९,९७३ | २०,०१,२२३ | ३१,१३६ |
| २०१६-१७ | ३,६४,८१९ | २८,५३२ | ३,९३,३५१ | २२,५७,०३२ | ३४,९९५ |
| २०१७-१८ | ४,०२,४२१ | ३३,५१८ | ४,४०,३२९ | २४,९६,५०५ | ३९,१७५ |
| २०१८-१९ | ४,०७,१५२ | ३४,०२१ | ४,४१,१७३ | २६,३२,७९२ | ३९,२५० |
| २०१९-२० | ४,६४,०२० | ३४,१७३ | ४,९८,१९३ | २८,७८,५८३ | ४४,३२३ |
| २०२०-२१ | ५,२०,७१७ | ३५,५३१ | ५,५६,२४८ | ३२,२४,०१३ | ४९,४८८ |

*स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०२०-२१टीप : अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१, सुधारित अंदाज २०१९-२० ) (टीप : राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी)*

- **राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. युती शासनाकडून आघाडी शासनाच्या हाती सत्ता आली त्यावेळी राज्यावरील कर्जाचा बोजा रु. ४२ हजार ६६६ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या १७.२%) होता. वर्ष २००४-०५ मध्ये आघाडी शासन दुसऱ्यांदा निवडून आले त्यावेळी हा बोजा रु. १ लाख ९ हजार १६७ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या २८.३%) एवढा वाढला होता. त्यावरील व्याज रु. १० हजार २५८ कोटी मिळून एकूण कर्ज रु. १ लाख १९ हजार ४२५ कोटी इतके झाले होते.**
- **वर्ष २०१४-१५ मध्ये युती शासनाकडे पुन्हा राज्याची धुरा आली. वर्ष २०१९-२० जेव्हा युती शासनाने शेवटचा अर्थसंकल्प सादर केला त्यावेळी राज्यावरील व्याजासहित कर्ज रु. ५ लाख ६ हजार ८४९ कोटी होते.**
- **महाविकास आघाडीने सादर केलेल्या वर्ष २०२०-२१ च्या पहिल्या अर्थसंकल्पात राज्यावरील एकूण कर्जाची रक्कम रु. ५ लाख ५६ हजार २४८कोटींवर.**
- **राज्यातील प्रत्येक व्यक्तीवर व्याजासहित असलेला कर्जाचा भार हा ४९ हजार ४८८ रुपये इतका आहे.**